| MHST140008262021 | दावा दाखल तारीख | ०७.०४.२०२१ |
|---|---|---|
| | दावा नोंद तारीख | ०७.०४.२०२१ |
| | दावा निकाल तारीख | २७.०७.२०२६ |
| | कालावधी | वर्षे महिने दिवस<br>०५ ०३ २० |

**फलटण येथील ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर फलटण, यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी– ए.एस.साटोटे)

**नियमित दिवाणी दावा क्र.९८/२०२१**

**निशाणी क्र.७१**

| | |
|---|---|
| सतिश दादाराम गावडे,<br>वय– ५२ वर्षे, धंदा– शेती,<br>रा.गोखळी, ता.फलटण, जि.सातारा | वादी |
| विरुध्द | |
| १. ज्ञानेश्वर अशोक खटके,<br>वय– २५ वर्षे, व्यवसाय– शेती,<br>२. अशोक गणपत खटके,<br>वय– ५२ वर्षे, व्यवसाय– शेती,<br>३. मैनाबाई अशोक खटके,<br>वय– ५४ वर्षे, व्यवसाय– शेती व घरकाम,<br>सर्व रा.गोखळी, ता.फलटण, जि.सातारा | प्रतिवादी |

---

वादीतर्फे विधीज्ञ – श्री.आर.एच.कर्णे

प्रतिवादींतर्फे विधीज्ञ – श्री.ए.सी.मोहिते

---

**न्या य नि र्ण य**

(घोषित दिनांक–२७.०७.२०२६)

प्रस्तुतचा दावा हा निरंतर ताकीद मिळणेसाठी दाखल केला आहे.

**वादीचे अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणेः—**

२. मौजे गोखळी, ता. फलटण, जि.सातारा येथील जमीन मिळकत गट क्र.५९ क्षेत्र १.३५ आर पो.ख.०.०४ एकूण १.३९ आर, आकार ०४.०६ पैसे पैकी १.०३ आर हिस्सा त्यासी चतुःसिमा पूर्वेस—प्रतिवादी क्र.३ चा गट क्र.५८, दक्षिणेस—ओढा, पश्चिमेस—चंद्रकांत गावडे यांचा गट क्र.६० व उत्तरेस—गोखळी ते बंधारा रस्ता येणेप्रमाणे चतुःसिमापूर्वक मिळकत हा या दाव्याचा विषय आहे. (सोयीकरीता यापुढे सदर मिळकतीस “दावा मिळकत” असे संबोधण्यात येईल.)

३. वादी असे कथन करतो की, दावा मिळकत ही वादी यांची वडीलोपार्जित मिळकत असून सदर मिळकत पूर्वी वादीचे वडील श्री. दादाराम मुरलीधर गावडे यांचे नावे व मालकी वहिवाटीस होती. असे असताना दावा मिळकतीबाबत वादी, त्यांचा भाऊ श्री.बापूराव दादाराम गावडे व त्यांचे वडीलानी दि.२.०७.२०१५ रोजी नोंदणीकृत वाटपपत्र करून दावा मिळकतीपैकी ० हे.३६ आर क्षेत्र वादीचे वडील श्री.दादाराम गावडे यांना व दावा मिळकतीपैकी उर्वरित १ हे.०३ आर क्षेत्र वादी यांचे वाटणीस दिले. सदर वाटणीपत्रास वादीचा भाऊ श्री.बापूराव गावडे याने संमती दिलेली आहे. सदरचे वाटपपत्र मा.दुय्यम निबंधक कार्यालय फलटण येथे त्याच दिवशी दस्त क्र.४०६३/२०१५ येथे नोंदलेले आहे. तसेच सदर वाटपपत्रानुसार गावी फेरफार नं.२०४२ ने नोंदी प्रमाणित झाल्या असून वाटपपत्र व सदर फेरफारनुसार वादी हे दावा मिळकतीपैकी १ हे.०३ आर क्षेत्राचे पूर्ण मालक व वहिवाटदार झालेले होते.

४. त्यानंतर वादीचे वडीलानी सन २०१५ मध्ये वाटपपत्राने जे दावा मिळकतीपैकी ० हे.३६ आर क्षेत्र वाटणीस दिले होते त्याबाबत वादीचे वडील श्री.दादाराम गावडे व वादीचा भाऊ बापूराव गावडे यांनी दि.१६.०३.२०१७ रोजी नोंदणीकृत वाटपत्र करून सदरचे ० हे.३६ आर क्षेत्र वादीचा भाऊ बापूराव यास वाटपाने देऊन त्याचे मालकी वहिवाटीस दिलेली आहे. सदरचे वाटपत्र फलटण दुय्यम निबंधक कार्यालयात त्याच दिवशी दस्त क्र.पलट २/९००/२०१७ येथे रितसर नोंदलेले आहे. तसेच सदर वाटपपत्रा अन्वये गावी फेरफार नं.२३४५ ने नोंदी प्रमाणित असून सदरचे वाटपत्र व फेरफार नं.२३४५ अन्वये वादीचा भाऊ श्री.बापूराव गावडे हा

दावा मिळकतीपैकी उर्वरित ० हे.३६ आर क्षेत्राचा मालक व वहिवाटदार झालेला असून सदरचे वादीचे भावाचे गट नं.५९ पैकी असणारे ० हे.३६ आर क्षेत्र हे दावा मिळकतीच्या वायव्य कोपऱ्यात गोखळी ते बंधारा रस्त्यालगत व ग.नं.५९ चे पश्चिमकडील बांधालगत आहे.

५. वर नमुद केल्याप्रमाणे वादी हे दावा मिळकतीचे पुर्ण मालक असून प्रत्यक्ष कब्जेदार व वहिवाटदार आहेत. तसेच, वादी मालकी हक्काने दावा मिळकत वहिवाटून त्यातुन वेगवेगळी पिके घेत आलेले आहेत. सदर दावा मिळकतीशी प्रतिवादी यांचा कसलाही हक्क व हितसंबंध नाही. प्रतिवादी हे केवळ दावा मिळकतीचे पूर्वेकडील लगत कब्जेदार आहेत. वादी व प्रतिवादींच्या मिळकतीमधील म्हणजेच दावा मिळकत गट क्र.५९ व प्रतिवादींची मिळकत गट क्र.५८ यामध्ये असणारा दक्षिण उत्तर बांध हा पूर्वीपासून कायम असून त्याप्रमाणे प्रत्येकाच्या बांधाच्या हद्दीच्या आत वहिवाटी आहेत. गट नं.५८ हा प्रतिवादी नं.३ व तिची आई अनुसया साधुबुवा गावडे यांचे नावे दाखल आहे. प्रतिवादी नं.१ ते ३ हे गट नं.५८ ची वहिवाट करतात.

६. वास्तविक वादी व त्याचे वडील व भाऊ यांचेतील वर नमुद वाटपपत्रे झालेनंतर वादी व प्रतिवादीच्या कुटुंबाने आपसंमतीने तोंडी अदलाबदलपत्राने दावा मिळकत गट नं.५९ ही प्रतिवादी नं.३ व तिची आई अनुसया गावडे यांना आणि त्यांची गट नं.५८ ही मिळकत वादी व त्याचे भावास तोंडी अदलाबदलपत्राने वहिवाटीस दिली होती. तोंडी अदलाबदलपत्रानुसार प्रतिवादी हे वादी व त्याचा भाऊ बापुराव यांचा ग.नं.५९ वहिवाटत होते, तर वादी व त्याचा भाऊ बापुराव हे प्रतिवादींची गट नं.५८ ही मिळकत वहिवाटत होते. परंतु वादी, त्याचा भाऊ बापुराव व प्रतिवादींना तांत्रिक अडचणी आलेने त्यांनी आपसात बसून आपआपल्या मालकीच्या व नावे नोंद असणाऱ्या मिळकती प्रत्यक्षात वहिवाटणेचे ठरून तोंडी अदलाबदलपत्र रद्द करणेचे ठरून त्यानुसार तोंडी अदलाबदलपत्र रद्द केलेबाबतचा करारनामा दि.१.०३.२०१९ रोजी मा.नोटरी पब्लिक सो.फलटण यांचेसमोर रजिस्टर केला तो वादी व त्याचा भाऊ बापुराव तसेच प्रतिवादी नं.३ व तिची आई अनुसया गावडे यांचेमध्ये झाला असून तो रितसर नोटरी कायद्यानुसार नोंदलेला आहे. सदर करारानुसार गट नं.५८ हा

प्रतिवादींचे मालकीची वहिवाटीचा असलेचे आणि या दाव्यातील मिळकत गट नं.५९ ही वादी व त्याचा भाऊ बापुराव यांच्या मालकी वहिवाटीची असलेचे व त्याप्रमाणे येथून पुढे वहिवाटीत राहतील असे वादी, त्याचा भाऊ बापुराव व प्रतिवादींनी ठरवून प्रत्यक्षात दोन्ही मिळकतीमधील असणाऱ्या पाईपलाईन दारी यामध्ये देखील दुरुस्त्या करून घेतलेल्या आहेत. तसेच वादी, त्याचा भाऊ बापुराव व प्रतिवादींनी एकमेकांना क्षेत्र वहिवाटीस कसलाही त्रास देणेचा नाही असे देखील ठरलेले होते व आहे. तेव्हापासून वादी, त्याचा भाऊ बापुराव व प्रतिवादी आपआपल्या मालकीच्या मिळकती प्रत्यक्षात जागेवर वहिवाटत आहेत व त्यातून वेगवेगळी पीके घेत आहेत.

७. दरम्यान दि.१.०३.२०१९ चा करार झालेपासून वादीची दावा मिळकतीत प्रत्यक्ष कब्जे वहिवाट असताना व सध्या वादीचे दावा मिळकतीत ऊसाचे पिक असताना प्रतिवादींचा दावा मिळकतीमध्ये कोणताही संबंध नसताना प्रतिवादी नं. १ ते ३ हे अलीकडे वादी प्रतिवादींच्या मिळकतीमध्ये असणारा दक्षिण उत्तर बांध साय धुसपूस करु लागले असून वारंवार दावा मिळकतीचा पूर्वेकडील असणारा दक्षिण उत्तर बांध पोखरत व फोडत आहेत व हद्दीवरुन वाद करुन दावा मिळकत वहिवाटणेस प्रतिवादी वादीला व त्यांचे कुटूंबियांना हरकत अडथळा करीत आहेत. दि.२४.०३.२०२१ रोजी वादी हे दावा मिळकतीतील ऊसाचे पिकांची बांधणी करणेसाठी गेले असता प्रतिवादींनी त्यास शिवीगाळ करुन मारहाण केली. त्याबाबत वादीने बरड दुरक्षेत्र येथे तक्रारी अर्ज दिला आहे. तसेच त्याची माहिती मिळताच दुसरे दिवशी दि.२५.०३.२०२१ रोजी दुपारी ३.३० वाजता वादी व त्याची पत्नी विशाखा हे दावा मिळकतीत ऊसाचे बांधास गवारीचे बियाणे टोकत असताना प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी दावा मिळकतीत येऊन “तु आमचे हद्दीत बी टोकू नको” असे म्हणून चिडून जावून प्रतिवादींनी वादी व त्याची पत्नी यांना शिवीगाळ व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. सदर घटनेबाबत वादीचे पत्नीने बरड दुरक्षेत्र येथे अदखलपात्र गुन्हा नं.३४५/२०२१ ने दाखल केलेला आहे.

८. प्रतिवादी हे आडदांड व खुनशी स्वभावाचे आहेत. तसेच ते वादी यांना वारंवार दावा मिळकत वहिवाटणेस हरकत अडथळा करीत आहेत. प्रतिवादीच्या अशा

वागण्याने वादीची दावा मिळकतीत असणारी शांततामय कब्जे वहिवाट धोक्यात आली आहे. त्यामुळे वादीला दावा मिळकत वहिवाटणेस अडचणीचे व जिकरीचे झाले आहे. त्यामुळे प्रतिवादी नं.१ ते ३ यांनी वादीचे दावा मिळकतीतील शांततामय कब्जे वहिवाटीस, मेहनत मशागतीस स्वतः व इतरांमार्फत हरकत व अडथळा करू नये तसेच दावा मिळकतीचा पूर्वेकडील असणारा दक्षिण उत्तर बांध पोखरू नये, फोडू नये अगर सदर बांधाशी छेडछाड करून नये अशी निरंतर व तुर्तातुर्त ताकीद प्रतिवादी यांना देण्याची विनंती केली आहे.

९. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी नि.क्र.१६ ला कैफियत दाखल केली आहे. त्यांचे कथनानुसार, प्रतिवादी नं.३ यांचे वडील साधू हे वादी यांचे चुलते आहेत. साधू गावडे यांना प्रतिवादी नं.३ व राजेंद्र अशी आपत्ये झाली. दरम्यानचे काळात साधू यांचे वृद्धापकाळाचे निधन झाले त्यानंतर त्यांना त्यांची पत्नी व एक मुलगा राजेंद्र व मुलगी अनुसया हे कायदेशीर वारस होते. सन १९९२ मध्ये राजेंद्र यांचे निधन झालेने प्रतिवादी नं.३ व तिची आई अनुसया याच साधू यांना कायदेशीर वारस ठरतात. त्याप्रमाणे त्यांची नावे ७/१२ रेकॉर्डला नमूद आहेत आणि त्या सदर गट नं.५८ मध्ये तेव्हापासून मालकी व कबजे वहिवाटीस आहेत.

१०. प्रतिवादीचे पूर्व हक्कदार साधू गावडे यांचा हिस्सा अलग व स्वतंत्र असा आहे आणि वादीचे पूर्व हक्कदार दादा मुरलीधर गावडे यांचा हिस्सा अलग व तुटक आहे. दादा गावडे व त्यांची २ मुले म्हणजेच वादी व त्यांचा भाऊ बापू यांचेमध्ये दोनवेळा वाटप झाले त्याची हकीकत वादीने दाव्यात नमूद केलेली आहे. त्यानंतर प्रतिवादीला लागून असणारा हिस्सा वादीचे वाटणीस पूर्वी आला म्हणजेच वादीच्या वाटणीस गट नं.५८ आला पण प्रत्यक्षात वादीला गट नं.५९ हवा होता म्हणून त्याने व प्रतिवादींनी आपसात दिनांक ०१.०३.२०१९ रोजी एकमेकांचे क्षेत्राची अदलाबदल केली व आता वादीकडे गट नं.५९ व प्रतिवादीकडे गट नं.५८ ही जमीन आली ही हकीकत वादीने दावा कलम ६ मध्ये नमूद केलेली आहे. त्याबाबत या प्रतिवादींची कसलीही तक्रार नाही.

११. प्रतिवादी नं.३ यांचा भाऊ राजेंद्र हा सन १९९२ मध्ये मयत झाल्याने

प्रतिवादी क्र.३ आणि आई अनुसया याच फक्त कायदेशीर वारस असलेने त्यांची नावे रेकॉर्ड सदरी दाखल आहेत. सदर बाब ही वादी यांना कायम खटकत असलेने आणि वादी यांचे चुलत्यांची मिळकत ही त्यांचे मुलीला म्हणजेच प्रतिवादी नं.३ हिला मिळू नये अशी वादीची पूर्वीपासूनची भावना होती. त्यामुळे वादी हा वारंवार प्रतिवादी व त्यांचे कुटुंबियांना गट नं.५८ मध्ये वहिवाट करण्यास वारंवार हरकत अडथळा करीत आहे. वादी यांनी जाणुनबुजून गट क्र.५८ व ५९ मध्ये जो पूर्वीपासून बांध अस्तित्त्वात होता तो दांडगाव्याने नष्ट केलेला आहे आणि गट नं.५८ मध्ये अतिक्रमण केलेले आहे. वादी यांनी दाव्यामध्ये नमूद केलेला बांध हा पूर्वीपासून सदर ठिकाणी कधीही अस्तित्वात नव्हता व नाही. वादी यांनी प्रतिवादी यांचे गट नं.५८ मध्ये बेकायदेशीररित्या अतिक्रमण करून आजमितीस अस्तित्वात असलेला बांध दोन्ही क्षेत्रामध्ये निर्माण केलेला आहे. सदर बांधाच्या ठिकाणावरुनच प्रतिवादी नं.१ ते ३ यांचा आक्षेप आहे. त्यामुळे गट नं.५८ व ५९ यांचे दरम्यान दोन्ही गटांना विभागणारा अधिकृत सरकारी बांध कोठे होता हाच वादाचा विषय आहे. मुळचा पूर्वपार असलेला सरकारी बांध वादीने उखडून टाकला त्यातून हा वाद निर्माण झाला आहे.

१२. वास्तविक वादी व प्रतिवादी यांनी पूर्वी आपआपसातील करारानुसार गट नं.५८ व ५९ यामध्ये अदलाबदल केलेली होती. त्यामुळे वादी यांना गट नं.५८ मधील जमिनीचे सुपिकतेबाबत पूर्ण कल्पना आहे. त्यामुळे वादी यांनी दिनांक ०१.०३.२०१९ रोजी उभयतांमधील बदली प्रस्ताव झाल्यानंतर प्रतिवादी यांना गट नं.५८ मधील संपूर्ण वहिवाट दिलेली नव्हती व नाही. त्यामुळे तेव्हापासूनच वादी हे प्रतिवादी नं.१ ते ३ यांना नाहक त्रास देवू लागलेले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून वादी यांनी प्रतिवादींना बांधावरून त्रास दिलेने प्रतिवादी नं.३ यांनी वादीविरुद्ध फलटण ग्रामीण पोलीस स्टेशनचे बरड आऊटपोस्ट येथे एन.सी.११२/२०१९ नोंदवली आहे. तसेच वादी यांनी वारंवार प्रतिवादींना त्रास दिलेने दिनांक ०९.०४.२०२१ रोजी देखील प्रतिवादींनी वादीविरुद्ध तक्रार नोंदविलेली आहे.

१३. वादी यांचे दाव्याप्रमाणे प्रतिवादी नं.१ ते ३ यांनी वादीला तथाकथित बांधावरून कधीही त्रास दिलेला नव्हता व नाही. तसेच वादीच्या तथाकथित बांधाचे

लगत असणारे क्षेत्रामध्ये वादीस वहिवाटीस कधीही हरकत अडथळा केलेला नव्हता. वादी यांनी सदर दाव्यामध्ये दाखल केलेल्या गट नं.५९ चे ७/१२ उताऱ्यावर वादी यांनी गट नं.५९ मध्ये घेत असलेल्या पिकांची नोंद पिकपाणी सदरी आहे. सदर नोंद पाहता सन २०१९-२०२० मध्ये व त्यापूर्वीही वादीने गट नं.५९ मधील त्यांचे संपूर्ण हिश्यामध्ये मका, गहू, ऊस अशी पिके घेतलेले स्पष्टपणे दिसून येते. यावरून वादी हे गट नं.५९ मधील त्यांचे संपूर्ण क्षेत्र कायम वहिवाटून पिके घेत असलेचे निष्पन्न होते. केवळ प्रतिवादींना नाहक त्रास देण्यासाठी त्यांना वहिवाटीस हरकत अडथळा करण्यासाठी खोट्या स्वरूपाच्या तक्रारी करून सदरचा खोटा दावा प्रतिवादींविरुद्ध दाखल केला आहे. करीता, वादीचा दावा फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

१४. **प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी यांनी वादी यांच्याविरुद्ध नि.क्र.२५ ला प्रतिदावा दाखल करुन प्रतिदाव्यातील प्रतिवादी यांच्याविरुद्ध निरंतर ताकीदीची मागणी केली आहे.**

**प्रतिदाव्यातील वादीचे अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणेः-**

१५. मौजे गोखळी, ता. फलटण, जि.सातारा येथील जमीन मिळकत गट क्र.५८ क्षेत्र १.२६ आर पो.ख.०.०५ एकूण १.३१ आर, आकार ०३.८१ पैसे त्यासी चतुःसिमा पूर्वेस-गट क्र.५७, दक्षिणेस-ओढा, पश्चिमेस-गट क्र.५९ व उत्तरेस-गोखळी ते गोखळी बंधारा रस्ता येणेप्रमाणे चतुःसिमापूर्वक मिळकत हा या प्रतिदाव्याचा विषय आहे. (सोयीकरीता यापुढे सदर मिळकतीस “दावा मिळकत” असे संबोधण्यात येईल.)

१६. प्रतिदावा करणार यांचे असे कथन आहे की, प्रतिदावा करणार व प्रतिवादी हे एकत्र कुटुंबातील असून प्रतिदावा करणार यांचे वडील हे प्रतिवादीचे चुलते आहेत. दरम्यानचे काळात उभयतांच्या कुटुंबातील बैठकीमध्ये गट नं.५८ व ५९ या मिळकतींची अदलाबदल करून त्या मिळकती त्यांनी वहिवाटण्याचे ठरले. त्याप्रमाणे गट नं.५८ जो प्रतिदावा करणार यांचे मालकी वहिवाटीचा होता तो प्रतिवादी हे वहिवाटीत होते, तर गट नं.५९ जो प्रतिवादी यांचे मालकी वहिवाटीचा होता तो प्रतिदावा करणार हे वहिवाटीत होते. त्यांचेमधील वहिवाट शांतपणे आणि विनाअडथळा

बरेच वर्ष चालू होती. त्यानंतर कुटुंबामध्ये पुन्हा बैठक होऊन सदरील गटातील जमीन मिळकत ही प्रत्यक्ष मालकाच्या मालकी वहिवाटीप्रमाणे देण्याचे उभयतांमध्ये ठरले. त्यानुसार दिनांक ०१.०३.२०१९ रोजी प्रतिदावा करणार आणि प्रतिवादी यांचेमध्ये करारनामा होवून पूर्वी अदलाबदल केलेले क्षेत्र हे ज्या त्या मालकांना परत वहिवाटीस देण्यात आले. त्याबाबत प्रतिदावा करणार व प्रतिवादी यांचेमध्ये कोणतेही वाद नाहीत.

१७. दिनांक ०१.०३.२०१९ पर्यंत प्रतिवादी हे प्रतिदावा करणार यांची गट मिळकत ५८ मधील शेताजमीन वहिवाटीत होते. सदर शेतजमीन ही गट नं.५९ मधील शेतजमिनीपेक्षा सुपिक अशी आहे. त्यामुळे प्रतिवादी यांना गट नं.५८ मधील वहिवाटीतून तुलनेने जास्त उत्पन्न मिळत होते. प्रतिदावा करणार नं.३ या व त्यांचे भाऊ नामे राजेंद्र साधु गावडे अशी त्यांचे वडीलांना दोनच अपत्ये होती. सन १९९२ मध्ये प्रतिदावा करणार यांचे भाऊ राजेंद्र हे मयत झाल्याने व त्यांचे लग्न झाले नसलेने साधु गावडे यांचे पश्चात त्यांचे नावे असणारे मिळकतींना श्रीमती अनुसया साधु गावडे (पत्नी) व मैनाबाई साधु गावडे लग्नांतरचे नांव सौ.मैनाबाई अशोक खटके (मुलगी) असे दोनच कायदेशीर वारस अस्तित्वात राहिले. कायद्यातील तरतुदीनुसार साधु गावडे यांचे पश्चात वर नमूद दोघींची नावे ७/१२ सदरी रेकॉर्डला लागली व तेव्हापासून प्रतिदावा करणार सदर प्रतिदावा मिळकत वहिवाटीत आहेत. याचाच राग मनात धरून आणि आपल्या चुलत्याच्या पश्चात त्याची मिळकत स्वतःला मिळावी म्हणून प्रतिवादी हे प्रतिदावा करणार यांना नाहक त्रास देत आहेत.

१८. दिनांक ०१.०३.२०१९ रोजी झालेल्या लेखी करारनाम्यातील अटीप्रमाणे उभयतांनी एकमेकाविरोध कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा केस करणेची नसून पंचासमक्ष वाद मिटवण्याचे नमूद असताना देखील प्रतिवादी हे प्रतिदावा करणार यांचे विरुद्ध खोट्या तक्रारी देऊन त्यांचे वहिवाटीस अडथळा निर्माण करीत आहेत. त्याबाबत प्रतिदावा करणार यांनी दिनांक ०८.०५.२०१९ रोजी म्हणजेच अदलाबदल करारनामा झालेनंतर लगेच दोनच महिन्यात लेखी तक्रार एन.सी. नं.११२/२०१९ ने प्रतिवादी विरुध्द नोंदविली. त्यानंतर प्रतिवादी काही दिवस गप्प बसले परंतु त्यानंतरही प्रतिवादीनी प्रतिदावा करणार यांना त्रास देणे सुरूच ठेवले व रे.दि.मु.क्र.९८/२०२१ हा

खोटा व बनावट दावा प्रतिदावा करणार यांचेविरुद्ध दाखल केला.

१९. प्रतिदावा करणार यांचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादीने गट नं.५८ व ५९ ची शासकीय मोजणी खात्यामार्फत मोजणी आणावी मग त्यामध्ये जो काही निर्णय होईल तो या प्रतिदावा करणार यांना मान्य व कबूल असेल. प्रतिवादी ज्या बांधावरून वाद उपस्थित करीत आहे तो बांध अस्तित्त्वात नसून प्रतिवादीने मूळ बांध फोडून त्याऐवजी सदरील कथित बांध घातला आहे व आपले गैरकृत्य लपवण्यासाठी सदरचा खोटा दावा मे.कोर्टात दाखल केला आहे व प्रतिदावा करणार यांचे प्रतिदावा मिळकतीमधील शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करत आहेत. म्हणून प्रतिदाव्यातील प्रतिवादीने स्वतः अथवा इतरांमार्फत प्रतिदावा करणार यांचे प्रतिदावा मिळकतीमधील शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करू नये अशी प्रतिवादीस निरंतर/तुर्तातुर्त ताकीद देण्याची विनंती केली आहे.

२०. प्रतिदाव्यातील प्रतिवादी म्हणजेच मुळ दाव्यातील वादी यांनी प्रतिदाव्यास नि.क्र.२९ वर आपली कैफियत व म्हणणे दाखल केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, मुळ वादीने प्रतिदावा करणार यांचे विरुद्ध मौजे गोखळी येथील दावा जमीन गट क्र.५९ बाबत दावा दाखल केला असून सदरची मिळकत ही वादी यांची वडिलोपार्जित मिळकत असलेचे व ती वादीचे वडील दादाराम मुरलीधर गावडे यांच्या नावे व मालकी वहिवाटीची असलेली कथन केले होते व आहे. तसेच सदर मिळकतीचे मुळ वादी, त्यांचा भाऊ बापूराव व त्यांच्या वडिलांनी दि.०२.०७.२०१५ रोजी नोंदणीकृत वाटपपत्र करून गट नं.५९ पैकी ०.३६ आर क्षेत्र वडील श्री.दादाराम गावडे व उर्वरित १ हे.०३ आर क्षेत्र वादीस वाटणीस दिले. त्याप्रमाणे फेरफार नं.२०४२ ने नोंदी झाल्या. तेव्हापासून वादी दावा मिळकत गट नं.५९ पैकी १ हे.०३ आर क्षेत्राचे पूर्ण मालक व वहिवाटदार झाले. त्यानंतर मुळ वादीचे वडिलांना वाटणीत दिलेली ०.३६ आर क्षेत्र पुन्हा दि.१६.०३.२०१७ रोजी नोंदणीकृत वाटपपत्राने मुळ वादीचा भाऊ बापूराव दादाराम गावडे यांना मुळ वादी व त्यांच्या वडिलांनी दिले. त्यानुसार फेरफार नं.२३४५ ने नोंद झाली होती व आहे.

२१. मुळ वादी दावा मिळकतीचे मालक व कब्जेदार असून दावा मिळकत गट

नं.५९ वहिवाटून त्यातून वेगवेगळी पिके ऊस, मका, गहू, ज्वारी, कांदा इ. घेत आलेले आहेत. त्यासाठी मुळ वादी लिफ्ट पाण्याची सहाय्यता घेत आलेले आहेत. आजही दावा मिळकत गट नं.५९ मध्ये वादीचे ऊसाचे उभे पीक आहे व दावा दाखल तारखेसही त्यामध्ये वादीचा प्रत्यक्ष कब्जा आहे. मुळ दावा मिळकत गट नं.५९ याचेशी प्रतिदावा करणार मुळ प्रतिवादी यांचा काडीमात्रही हक्क वा हितसंबंध नव्हता व नाही. केवळ दावा मिळकत गट नं.५९ चे पूर्वेस लगत असणारा गट नं.५८ हा प्रतिदावा करणार यांचे मालकीचा आहे. गट नं.५९ व ५८ मधील असणारा दक्षिण उत्तर बांध देखील पूर्वीपासून कायम असून त्याप्रमाणे प्रत्येकाच्या आपआपल्या मिळकतीत कब्जे वहिवाटी आहेत. गट नं.५८ व ५९ मधील असणारा दक्षिण उत्तर बांध पूर्वीपासून कायम आहे.

२२. दरम्यान मुळ वादी व त्याचा भाऊ बापूराव हे दावा मिळकत गट नं.५९ चे नोंदणीकृत वाटपपत्राने मालक व वहिवाटदार झालेनंतर मुळ वादी प्रतिवादी यांनी आपसात बसून तोंडी अदलाबदलपत्राने दोन्ही मिळकती सन २०१७ नंतर दुसऱ्यास एकमेकास वहिवाटीस दिल्या होत्या. परंतु रेकॉर्डला नोंद वेगळी मिळकत व प्रत्यक्ष वहिवाटीस वेगळी मिळकत त्यामुळे पीक पाण्याच्या व वहिवाटीच्या तांत्रिक अडचणी मुळ वादी व मुळ प्रतिवादी दोघांनाही येऊ लागल्या व त्यामुळे दोघांनी आपसात बसून तोंडी अदलाबदलपत्र रद्द करणेचे ठरवून ज्याच्या त्याच्या नावे असणा–या मिळकती नावाप्रमाणे व रेकॉर्डप्रमाणे पूर्वी सारख्या कायम करणेचे ठरवून त्यानुसार वहिवाटी व कब्जे केले. म्हणजेच दावा मिळकत गट क्र.५९ हा मुळ वादी व त्याचा भाऊ बापूराव यांचे वहिवाटीस परत दिला व प्रतिदावा मिळकत गट क्र.५८ हा प्रतिदावा करणार यांचे वहिवाटीस कब्जा दिला. त्यानुसार आपापल्या मिळकतींमध्ये असणा–या पाईपलाईन व दारी यामध्ये देखील त्यांनी दुरुस्त्या करुन घेतल्या आहेत. तसेच मुळ वादी व मुळ प्रतिवादी दोघांनी एकमेकांच्या वहिवाटीत कसलाही त्रास देणेचा नाही असे ठरले व त्यानुसार दि.०१.०३.२०१९ रोजी दोघांनी तसा तोंडी अदलाबदलपत्र रद्द केलेचा करारनामा नोंदवून ठेवला व त्या तारखेपासून मुळ वादी व प्रतिदावा करणार यांच्या आपआपल्या मिळकती स्वतंत्र मालकी व कब्जे वहिवाटीस आजमितीस आहेत.

२३. वास्तविक प्रतिदावा करणार कथन करतात त्याप्रमाणे साधु हे मुळ

वादीचा चुलता कधीही नव्हता व नाही. याकामी चुकीची वंशावळ, चुकीचे नातेसंबंध प्रतिदावा करणार यांनी दाखवले आहेत. प्रतिदावा करणार नं.३ मैनाबाई हिला राजेंद्र हा भाऊ होता. त्याचे मौजे जळगांव येथील मंदाबाई खोमणे नावचे मुलीशी लग्न देखील झालेले होते. मौजे गोखळी येथील प्रतिदावा करणार यांचे कुटुंबाचा गट नं.२२ हा साधू यांनी राजेंद्र यांचे नावावरती केलेला होता. राजेंद्रचे लग्न होताना चारच दिवसात मैनाबाई हिने सदर मिळकतीतील हिस्सा तिचे देखील नावावर करावा म्हणून राजेंद्रशी भांडण केले. सदर भांडण एवढे विकोपाला गेले की, राजेंद्र याने त्याचे लग्नानंतर आठव्या दिवशी निरा नदीचे पुरात उडी घेऊन आत्महत्या केली ही खरी वस्तुस्थिती प्रतिदावा करणार यांनी लपवून ठेवली आहे. तसेच राजेंद्र याची पत्नी मंदाबाई हयात असतानाही तिला लपवून ठेवून व राजेंद्रचे लग्न झाले नव्हते अशी खोटी विधाने करून गट नं.२२ तसेच प्रतिदावा मिळकत ग.नं.५८ या मिळकती प्रतिदावा करणार यांनी बळकावलेली आहेत.

२४. मुळात मुळ दाव्यास प्रतिदावा करणार यांनी दिलेली कैफियत व प्रतिदाव्यामध्ये केलेली विधाने पाहता दावा मिळकत गट नं.५९ ची मुळ वादीची मागणी वहिवाट त्यांनी मान्य केलेली आहे. प्रतिदाव्यात कथन केलेप्रमाणे मुळ वादीनी कधीही प्रतिदावा करणाऱ्यांच्या कब्जे वहिवाटीस हरकत व अडथळा केलेला नव्हता अगर अतिक्रमण कधीही केले नव्हते. प्रतिदावा करणार यांनी विनाकारण वादीचे मुळ दाव्यास काटशह देणेसाठी पश्चातबुद्धीने प्रतिदावा केला व मुळ वादीस खर्चात टाकले आहे. सबब, प्रस्तुतचा प्रतिदावा हा मुळ वादी यांचे खर्चासह फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

२५. वादी व प्रतिवादी यांची कथने व दाखल कागदपत्रे पाहिली. माझे पूर्व पिठासीन अधिकारी यांनी खालील मुद्दे काढलेले असून त्यावरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे –

| अ.क्र. | दाव्यातील मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी सिद्ध करतो काय की, गट क्र.५९ मधील वादी | होकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| | यांच्या मिळकतीमध्ये असणा–या दक्षिणोत्तर बांधास प्रतिवादी क्र.१ ते ३ पोखरुन व फोडून हद्दीवरुन वाद करत आहेत ? | |
| २. | वादी सिद्ध करतो काय की, गट क्र.५९ मधील वादी यांच्या मिळकतीतील त्यांच्या शांततामय कब्जे वहिवाटीस प्रतिवादी क्र.१ ते ३ हे वादी व त्यांच्या कुटूंबियांना हरकत व अडथळा करतात ? | होकारार्थी |
| ३. | वादी मागणीप्रमाणे निरंतर ताकीद मिळणेस पात्र आहे काय ? | होकारार्थी |
| ४. | आदेश व हुकूमनामा काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

| **अ.क्र.** | **प्रतिदाव्यातील मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | प्रतिदावा करणार हे सिद्ध करतात काय की, प्रतिदाव्यातील प्रतिवादी (मुळ दाव्यातील वादी) यांनी गट क्र.५८ व ५९ मधील मुळ बांध फोडून कथित बांध घातला ? | नकारार्थी |
| २. | प्रतिदावा करणार हे सिद्ध करतात काय की, गट क्र.५८ मधील प्रतिदावा करणार यांच्या मिळकतीमधील त्यांच्या शांततामय कब्जे वहिवाटीस प्रतिदाव्यातील प्रतिवादी (मुळ दाव्यातील वादी) हरकत व अडथळा करतात ? | नकारार्थी |
| ३. | प्रतिदावा करणार हे मागणीप्रमाणे निरंतर ताकीद मिळणेस पात्र आहेत काय ? | नकारार्थी |
| ४. | आदेश व हुकूमनामा काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## का र ण मि मां सा

२६. वादीने त्याच्या दाव्यातील कथने सिद्ध करण्याकरीता त्याचे स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र नि.क्र.५२ वर दाखल केले आहे. वादीने सा.क्र.२ बापुराव गावडे यांचे पुराव्याचे शपथपत्र नि.क्र.६७ वर दाखल केले आहे. याव्यतिरिक्त वादीने कागदोपत्री पुरावा म्हणून संचिकेवर गट क्र.५९ व ५८ यांचे ७/१२ उतारे नि.क्र.७ व ८ वर दाखल केले आहेत. वादीने फेरफार क्र.२०४२, २३४५, ११०, ९४, २०२० च्या सत्यप्रती नि.क्र.९, १०, ६३, ६४ व ६५ वर दाखल केल्या आहेत. वादीने वाटणीपत्र क्र.४०६३/२०१५ व ९००/२०१७ यांच्या मुळ प्रती नि.क्र.६० व ६८ वर दाखल केल्या आहेत. वादीने दि.०१.०३.२०१९ रोजीच्या गट क्र.५८ व ५९ बाबतच्या नोटरी करारनाम्याची छायांकित प्रत नि.क्र.६२ वर दाखल केली आहे. वादी यांनी पुरावा बंद पुरसिस नि.क्र.६९ ला दाखल केलेली आहे. प्रतिवादींनी त्यांची कथने सिद्ध करण्यासाठी कोणताही पुरावा दिलेला नाही.

**दावा मुद्दा क्र. १ ते ३ करीता –**

२७. वादीने त्याच्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रात असे कथन केले आहे की, दावा मिळकत गट क्र.५९ यापैकी क्षेत्र १ हे.०३ आर आहे. सदर दावा मिळकतीचे पूर्वेस प्रतिवादी यांचा गट क्र. ५८ आहे. दावा मिळकत ही वादीला नोंदणीकृत वाटपपत्र क्र.४०६३/२०१५ याद्वारे मिळालेली आहे. वाटणीपत्र क्र.९००/२०१७ नुसार वादीचा भाऊ बापूराव यास गट क्र.५९ पैकी ३६ आर क्षेत्र वाटपाने दिले होते. त्याप्रमाणे वादी व त्याचा भाऊ गट क्र.५९ यातील शेती मालकी हक्काने वहिवाटीत होते. असे असताना वादी, त्याचा भाऊ व प्रतिवादी यांनी तोंडी बोलीने गट क्र.५८ व ५९ यांची आदलाबदल केली व वादी काही काळ गट क्र. ५८ वहिवाटत होता व प्रतिवादी गट क्र.५९ वहिवाटत होता. परंतु, तांत्रिक अडचणी आल्याने वादी व प्रतिवादी यांनी आदलाबदल पत्र हे दि.०१.०३.२०१९ रोजीचे नोटरी करारनाम्याने रद्द करुन घेतले व गट क्र.५९ पुन्हा वादीचे वहिवाटीस आला व गट क्र.५८ हा प्रतिवादींचे वहिवाटीस आला. सदर करारनाम्यानंतर वादी हा दावा मिळकत गट क्र.५९ वहिवाटत होता. त्याचे दावा मिळकतीत ऊसाचे पिक असताना प्रतिवादी क्र.१ ते ३ आले व दावा मिळकतीचा

पूर्वेकडील असणारा उत्तर दक्षिण बांधास धुसपुस करु लागले. त्यामुळे उत्तर दक्षिण बांधाचे वहिवाटीवरुन प्रतिवादी हरकत अडथळा निर्माण करु लागले. तसेच, त्यांनी वादीच्या पत्नीला लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन शिवीगाळ केली, वादीला ही मारहाण केली. त्यामुळे वादीला सदरचा दावा दाखल करणे भाग पडले आहे. प्रतिवादी व त्यांच्या वकिलांना वादीचा उलटतपास घेण्याची वेळोवेळी संधी देवूनही प्रतिवादींनी वादीचा उलटतपास न घेतल्याने प्रतिवादींचा उलटतपास बंद करण्यात आला. सदर वादीचा उलटतपास न घेतल्यामुळे वादीने सरतपासात सांगितलेल्या बाबी आव्हानित झालेल्या नाहीत व त्या सादर केलेल्या कागदोपत्री पुराव्याशी सुसंगत असल्यामुळे वादीचा पुरावा विश्वासाहार्य वाटतो.

२८. वादीतर्फे सा.क्र.२ बापुराव गावडे यांनी त्याचे पुराव्याचे शपथपत्र नि.क्र.६७ वर दिले आहे. त्याने असे कथन केले आहे की, वादी त्याचा भाऊ आहे. गट क्र.५९ ही वादी व त्याच्या मालकी वहिवाटीची आहे. दि.०२.०७.२०१५ रोजी वाटणीपत्रानुसार गट क्र.५९ या मिळकतीपैकी १ हे. ३ आर क्षेत्र वादीला देण्यात आले. त्याने सदरचे वाटपपत्र नि.क्र.६० हे बरोबर असल्याचे सांगितले. त्याने पुढे असे कथन केले की, उर्वरित ३६ आर क्षेत्र हे दुस–या वाटपपत्रानुसार त्याच्या ताब्यात देण्यात आले होते. सदरचे वाटपपत्र त्याने नि.क्र.६८ वर दाखल केले व त्यातील मजकूर बरोबर असल्याचे सांगितले. दावा मिळकत गट क्र.५९ पैकी १ हे. ३ आर हे वादीचे व ३६ आर क्षेत्र हे त्याचे मालकी वहिवाटीचे असल्याचे त्याने कथन केले आहे. सदर गट क्र.५९ च्या पूर्व बाजूस प्रतिवादींचा गट क्र.५८ असल्याचे व त्यामध्ये उत्तर दक्षिण वहिवाटीचा बांध असल्याचे नमुद केले आहे. प्रतिवादी हे दावा मिळकतीतुन दक्षिण उत्तर बांध फोडत व पोखरत असल्याचे व त्यावरुन वादीशी त्यांचा वाद झाल्याचे कथन केले आहे. प्रतिवादी व त्यांच्या वकिलांना वादीतर्फे सा.क्र.२ चा उलटतपास घेण्याची वेळोवेळी संधी देवूनही प्रतिवादींनी वादीच्या साक्षीदाराचा उलटतपास न घेतल्याने प्रतिवादींचा उलटतपास बंद करण्यात आला. सदर वादीच्या साक्षीदाराचा उलटतपास न घेतल्यामुळे साक्षीदाराने सरतपासात सांगितलेल्या बाबी आव्हानित झालेल्या नाहीत व त्या सादर केलेल्या कागदोपत्री पुराव्याशी सुसंगत असल्यामुळे वादीच्या साक्षीदाराचा पुरावा विश्वासाहार्य वाटतो.

२९. संचिकेवर दाखल तोंडी व कागदोपत्री पुराव्यांचे वाचन केले. वादीतर्फे विधीज्ञ श्री. आर.एच.कर्णे यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी व त्यांच्या वकिलांना पुरेशी संधी देवून त्यांनी युक्तीवाद केलेला नाही. प्रस्तुतचा दावा हा वादी यांनी प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्याविरुद्ध निरंतर ताकीदीकरीता दाखल केला आहे. अशा परिस्थितीमध्ये वादींनी दावा मिळकतीवरील त्यांची मालकी व ताबा सिद्ध करण्यासाठी काय साक्षीपुरावे दाखल केले आहेत ते पाहणे गरजेचे आहे. वादीचे असे कथन आहे की, दावा मिळकत गट क्र.५९ पैकी १ हे. ३ आर त्याला वाटपपत्र क्र.४०६३/२०१५ यानुसार वाटपात मिळालेले आहे. वादीने सदर वाटपपत्राची मुळ प्रत संचिकेवर नि.क्र.६० वर दाखल केलेली आहे. सदर वाटपपत्र दस्त ४०६३/२०१५ याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दि.०२.०७.२०१५ रोजी वादी सतिश गावडे व त्याचे वडिल दादाराम गावडे यांच्यात गट क्र.५९ चे वाटप झाले आहे. सदर वाटपपत्रास वादीचा भाऊ बापू गावडे याने संमती दिलेली आहे. सदर वाटपपत्रानुसार गट क्र.५९ एकूण क्षेत्र १ हे. ३९ आर यापैकी वादीला १ हे. ०३ आर इतके क्षेत्र व वादीचे वडिल यांना ३६ आर इतके क्षेत्र देण्यात आले आहे. व त्यानुसार वादी हा त्याचे १ हे. ०३ आर क्षेत्राचा मालक व वहिवाटदार झाला आहे. नि.क्र.७ वर दाखल गट क्र.५९ च्या ७/१२ उता–यावरुन असे दिसून येते की, वादीचे सदर गटामध्ये १ हे. ०३ आर क्षेत्र आहे. फेरफार क्र.२०४२ हा नि.क्र.९ वर दाखल आहे व त्यावरुन असे दिसून येते की, वादी व त्याच्या वडिलांमध्ये गट क्र.५९ च्या क्षेत्राबाबत वाटप झाले आहे व सदर फेरफारनुसार वादीचे नाव गट क्र.५९ चे ७/१२ उता–यास १ हे. ०३ आर क्षेत्रास लावण्यात आले आहे.

३०. प्रतिवादींनी ही त्यांच्या कैफियतीमध्ये वादी हा गट क्र.५९ चा मालक व वहिवाटदार आहे ही बाब नाकारलेली नाही. प्रतिवादींच्या कथनावरुन असे दिसून येते की, गट क्र.५८ हा प्रतिवादींच्या मालकीचा आहे. गट क्र.५८ व ५९ हे वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये तोंडी आदलाबदल झाले होते व काही काळासाठी दावा मिळकत गट क्र.५९ ही प्रतिवादींना दिली होती व गट क्र.५८ हा वादींच्या ताब्यात देण्यात आला होता. परंतु, दि.०१.०३.२०१९ रोजी नोटरी करारनाम्यानुसार सदरचे आदलाबदल हे रद्द करण्यात आले व गट क्र. ५८ हा प्रतिवादीला व गट क्र. ५९ हा पुन्हा वादीला देण्यात आला आहे. याठिकाणी असा प्रश्न निर्माण होतो की, तोंडी आदलाबदल केल्याने मिळकतीची

मालकी व ताबा एकमेकांकडे हस्तांतरीत होवून शकते काय. याप्रसंगी संपत्ती हस्तांतरण कायदा कलम ११८ चे वाचन केले असता असे दिसून येते की, संपत्तीची आदलाबदल करायची असल्यास ती संपत्तीची विक्री करण्याच्या तरतुदीनुसार केली जाते. संपत्तीची विक्रीची तरतुद ही कलम ५४ मध्ये विशद केली आहे. त्यामध्ये असे स्पष्टपणे नमुद आहे की, अचल मालमत्ता १००/– रुपये पेक्षा अधिक रक्कमेची असल्यास सदरचे हस्तांतरण हे केवळ नोंदणीकृत दस्तानेच झाले पाहिजे. त्यामुळे वादी व प्रतिवादींमध्ये गट क्र.५८ व ५९ यामध्ये झालेली आदलाबदल ही कलम ५४ मध्ये नमुद तरतुदीनुसार नोंदणीकृत दस्ताने झालेली नसल्यामुळे सदरची आदलाबदल ही कायदेशीर आहे असे म्हणता येणार नाही. त्यामुळे दावा मिळकत गट क्र.५९ ही वादीच्याच मालकी व कब्जे वहिवाटीस होती व सदर आदलाबदलमुळे वादीच्या मालकी हक्कावर त्यामुळे कोणताही परिणाम होत नाही. संचिकेवर दाखल नि.क्र.६२ वरील करारनाम्यानुसार वादी व प्रतिवादी दरम्यान झालेली आदलाबदल ही रद्द झालेली आहे. त्या ही कारणास्तव वादीची दावा मिळकत गट क्र.५९ वर असलेली मालकी व ताबा हा अबाधीत राहिलेला आहे असे दिसून येतो. त्यामुळे वर नमुद कारणास्तव वादी हा दावा मिळकतीचा मालक व कब्जेदार आहे ही बाब वादीने सिद्ध केली आहे या निष्कर्षास मी आलो आहे.

३१. वादीने त्याच्या दाव्यात तसेच पुराव्याच्या शपथपत्रात असे स्पष्टपणे कथन केले आहे की, दि.२५.०३.२०२१ रोजी दुपारी ३.३० वाजता तो व त्याची पत्नी विशाखा दावा मिळकतीत बियाणे टोकत असताना प्रतिवादी क्र.१ ते ३ तेथे आले व त्यांनी वादीला बी टाकण्यासाठी प्रतिबंध केला. तसेच, वादीला व त्याच्या पत्नीला शिवीगाळ व मारहाण केली. प्रस्तुत दाव्यात प्रतिवादींनी वादीचा उलटतपास न घेतल्यामुळे वादीची सदरची कथने ही आव्हानित झालेली नाहीत. त्यामुळे वादीचा पुरावा हा विश्वासाहार्य वाटतो. वादीचे साक्षीदार क्र.२ याने त्याचे पुराव्याचे शपथपत्र नि.क्र.६७ वर दाखल केले आहे व त्यामध्ये त्याने कथन केले आहे की, वादी हा त्याचा भाऊ आहे. वादीचे गट क्र.५९ मध्ये १ हे. ०३ आर क्षेत्र आहे व त्याचे स्वतःचे सदर गटात ३६ आर क्षेत्र आहे. सदर गटाच्या पूर्व बाजूस प्रतिवादी यांचा गट क्र.५८ आहे. प्रतिवादी हे वादीच्या दावा मिळकतीचा दक्षिणोत्तर वहिवाटीचा बांध हा फोडत व पोखरत असतात. त्या कारणावरुन त्यांनी वादीला व त्याच्या पत्नीला शिवीगाळ, मारहाण, दमदाटी देखील

केली आहे. प्रतिवादीने सदर साक्षीदाराचा देखील उलटतपास घेतलेला नाही. त्यामुळे साक्षीदाराची साक्ष ही आव्हानित झालेली नाही. वादीचे व साक्षीदाराचे तोंडी पुराव्यावरुन असे सिद्ध होते की, प्रतिवादी हे वादीच्या दावा मिळकत गट क्र.५९ चा दक्षिणोत्तर बांध हा पोखरुन फोडत आहेत. तसेच, ते वादीच्या दावा मिळकतीवरील शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा निर्माण करीत आहेत. त्यामुळे मी दाव्यातील मुद्दा क्र.२ व ३ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

३२. संचिकेवरील दाखल तोंडी व कागदोपत्री पुराव्यावरुन असे सिद्ध होत आहे की, वादी हा गट क्र.५९ मधील १ हे. ०३ आर क्षेत्राचा मालक व कब्जेदार आहे. परंतु, प्रतिवादी क्र.१ ते ३ ने वादीच्या गट क्र.५९ चा दक्षिणोत्तर बांध हा पोखरत, फोडत आहे. प्रतिवादी हे वादीच्या दावा मिळकतीवरील असलेल्या शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा निर्माण करीत आहे. वादी हा दावा मिळकतीचा मालक व कब्जेदार असल्यामुळे त्याला दावा मिळकतीचा शांततामय उपभोग घेण्याचा कायदेशीर हक्क व अधिकार आहे. परंतु, प्रतिवादी हे बेकायदेशीरपणे वादीच्या दावा मिळकतीवर असलेल्या शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत करीत आहेत. अशा प्रसंगी वादीच्या लाभात मनाई हुकूम न दिल्यास वादी हा दावा मिळकतीचा शांततामय उपभोग घेवू शकणार नाही व परिणामी त्याचे कधीही व कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे वर नमुद कारणास्तव वादी हा त्याच्या मागणीप्रमाणे निरंतर ताकीद मिळणेस पात्र आहे, या निष्कर्षास मी आलो आहे. करीता, मुद्दा क्र.३ चे उत्तर मी होकारार्थी नोंदवत आहे.

**प्रतिदावा मुद्दा क्र. १ ते ३ करीता –**

३३. प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी नि.क्र.२५ ला प्रतिदावा दाखल केला आहे. त्यांनी प्रतिदाव्यामध्ये असे कथन केले आहे की, ते गट क्र.५८ चे मालक व वहिवाटदार आहेत. वादीचा गट क्र.५९ आहे. गट क्र.५८ हा गट क्र. ५९ पेक्षा अधिक सुपिक आहे व त्यातुन जास्त उत्पन्न मिळते. वादीला सदर गट क्र.५८ हा त्याला मिळावा अशी इच्छा होती. परंतु वारसा हक्काने गट क्र.५८ हा प्रतिवादींना मिळाला आहे. त्यामुळे वादी प्रतिवादींचे गट क्र.५८ वरील वहिवाटीस हरकत अडथळा करीत आहे.

त्यांनी सदरचा खोटा दावा हा प्रतिवादींविरुद्ध दाखल केला आहे. प्रतिवादींना वारसाने मिळालेली जमीन करु न देणे हा वादीचा हेतु आहे. मार्च २०२१ मध्ये वादीने गट क्र.५८ च्या मिळकतीचा बांध फोडला. त्यामुळे प्रतिवादींना सदरचा प्रतिदावा करणे भाग पडले आहे. प्रतिवादींनी वादीविरुद्ध निरंतर ताकीद मिळण्याची विनंती केली आहे.

३४. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी यांनी तुर्तातुर्त मनाई हुकूमाच्या अर्जाच्या निकालानंतर, मुद्दे निश्चीतीनंतर प्रतिदाव्यातील कथने सिद्ध करण्यासाठी पुरावा सादर करणे गरजेचे होते. परंतु, प्रतिवादींनी प्रतिदाव्यातील कथने सिद्ध करण्याकरीता कोणताही तोंडी अथवा कागदोपत्री पुरावा दिलेला नाही. त्यामुळे प्रतिवादी यांनी त्यांची प्रतिदाव्यातील कथने ही सिद्ध केलेली नाहीत. त्यामुळे प्रतिदाव्यासंदर्भात मुद्दा क्र.१ ते ३ हे प्रतिवादींनी सिद्ध केलेले नाहीत या निष्कर्षास मी आलो आहे. करीता, मी मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवत आहे.

**<u>दावा व प्रतिदावा मुद्दा क्र.४ करीता</u> –**

३५. दाव्यातील नमुद मुद्दा क्र.१ ते ३ यांचे होकारार्थी निष्कर्ष पाहता वादीचा दावा हा खर्चासह मंजूर होण्यास पात्र आहे. प्रतिदाव्यातील नमुद मुद्दा क्र.१ ते ३ यांचे नकारार्थी निष्कर्ष पाहता प्रतिवादींचा प्रतिदावा हा खर्चासह नामंजूर होण्यास पात्र आहे. करीता, मी दावा व प्रतिदावा मुद्दा क्र.४ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादीचा दावा खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी स्वतः अथवा त्यांचे नोकर, प्रतिनिधी, वारस किंवा इतर कोणत्याही इसमांमार्फत वादींच्या दावा मिळकतीत असलेल्या शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये असा निरंतर मनाई हुकूम प्रतिवादींविरुद्ध देण्यात येत आहे.

३. प्रतिवादींचा प्रतिदावा खर्चासह नामंजूर करण्यात येत आहे.

४. येणेप्रमाणे दाव्याचा व प्रतिदाव्याचा हुकूमनामा तयार करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

ANIL SITARAM SATOTE
Digitally signed by ANIL SITARAM SATOTE
Date: 2026.07.27 17:35:15 +0530

फलटण. (ए.एस.साटोटे)

दिनांकः–२७.०७.२०२६ ३ रे सह दिवाणी न्यायाधीश 'क' स्तर, फलटण